**गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रति दिन प्रति पशु रु.५०/- अनुदान योजना राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: पविआ-११२४/प्र.क्र. १८४ /पदुम-३,**
मंत्रालय विस्तार,मुंबई- ४०००३२
दिनांक : ०८ ऑक्टोबर, २०२४

**वाचा :-** १. आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांचे पत्र क्र.एसएलटी/प्र.क्र.२१६/प्रति दिन अनुदान/६८०१/२०२४/पंस-१२, दि. १२.०७.२०२४
२. दि. ३०.०९.२०२४ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना-**

राज्यात दि.४ मार्च, २०१५ पासून महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५ लागू करण्यात आला आहे. या कायद्यानुसार संपूर्ण गोवंशीय प्राण्यांच्या कत्तलीवर प्रतिबंध करण्यात आलेला आहे. त्यामुळे शेतकामासाठी, ओझी वाहण्यासाठी व पैदाशीसाठी उपयुक्त नसलेले गोवंशीय बैल व वळू यांच्या कत्तलीवर बंदी घालण्यात आलेली आहे. परिणामी, शेती व दूध यासाठी अनुत्पादक असलेल्या गोवंशीय पशुधनाच्या संख्येत वाढ होत आहे. या सर्व पशुधनाचा सांभाळ / संगोपन करणे पशुपालकांना व्यवसायिकदृष्टया परवडणारे नसल्याने अशी बहूतांश जनावरे एकतर मोकाट सोडली जातात किंवा गोशाळेत ठेवण्यात येतात.

सदर पशुधन हे अनुत्पादक किंवा कमी उत्पादन क्षमतेचे असल्याने गोशाळांवर मोठया प्रमाणात आर्थिक भार पडत आहे. देशी वंशाच्या गोधनाचे जतन व संवर्धन करण्यासाठी देशी गोधनाचे संगोपन करण्याचे काम गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्था यांच्यामार्फत करण्यात येते. मात्र सदर पशुधनापासून अत्यल्प उत्पन्न मिळत असल्याने गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्थांना आर्थिकदृष्टया परवडत नाही. यास्तव, गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्था बळकट करण्याकरिता त्यांना गो संगोपनासाठी आर्थिक सहाय्य देण्याच्या योजनेस मा. मंत्रिमंडळाने दि. ३० सप्टेंबर,२०२४ रोजी पार पडलेल्या बैठकीत मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

आजमितीस देशी गायींची उत्पादनक्षमता कमी असल्यामुळे त्यांचे संगोपन करणे व्यावसायिकदृष्टया किफायतशीर ठरत नाही. तसेच भाकड / अनुत्पादक गायींचे संगोपन करणे पशुपालकांना फायदेशीर नसल्याने अशी जनावरे गोशाळेत ठेवण्यात येतात. त्यामुळे गोशाळांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्याची आवश्यकता विचारात घेऊन सन २०२४-२५ पासून महाराष्ट्र गोसेवा

आयोगाकडे नोदणीकृत असलेल्या गोशाळेत ठेवण्यात येणाऱ्या गायींना रु.५०/- प्रति दिन प्रति गोवंश अनुदान देण्यासाठी पुढील प्रमाणे योजना राबविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**(अ) <u>योजनेचे स्वरुप</u> :-**

(१) महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोदणीकृत असलेल्या गोशाळातील भारत पशुधन प्रणालीवर नोंद असलेल्या देशी गायींच्या परिपोषणासाठी प्रति दिन अनुदान अनुज्ञेय राहील.

(२) अनुदानाची रक्कम :- रुपये ५०/- प्रति दिन प्रति देशी गाय.

(३) अनुदान पात्रतेच्या अटी :-

(१) महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोदणीकृत असलेल्या गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्था अनुदानासाठी पात्र राहतील.

(२) संस्थेस गोसंगोपनाचा कमीतकमी तीन वर्षाचा अनुभव असावा.

(३) गोशाळेत किमान ५० गोवंश असणे आवश्यक राहील.

(४) संस्थेतील गोवंशीय पशुधनास ईअर टॅगिंग (भारत पशुधन प्रणालीवर) करणे अनिवार्य राहील.

(५) ईअर टॅगिंग असलेले गोवंशीय पशुधन अनुदानास पात्र राहील.

(६) संस्थेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे.

**(ब) योजनेची अंमलबजावणी :-**

(१) सदर योजना महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत राबविण्यात येईल.

(२) योजनेंतर्गत अनुदानासाठी Online पध्दतीने अर्ज महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडून अर्ज मागविण्यात येतील.

(३) अनुदानासाठी अर्ज करतांना संबंधित गोशाळांनी मागील तीन वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

(४) प्राप्त अर्जाची छाननी, त्रुटींची पूर्तता गोसेवा आयोगाच्या स्तरावर करण्यात येईल.

(५) गोसेवा आयोगास प्राप्त झालेले ऑनलाईन अर्ज व त्याचा तपशिल संबंधित “जिल्हा गोशाळा पडताळणी समिती” यांना पडताळणीसाठी उपलब्ध करुन देईल.

(६) प्रत्येक जिल्हयात पुढील प्रमाणे “जिल्हा गोशाळा पडताळणी समिती” गठित करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त (संबंधित जिल्हा) | अध्यक्ष |
| २ | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, (संबंधित जिल्हा) | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३ | नोदणीकृत गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्था ज्या कार्यक्षेत्रात असेल त्या तालुक्यातील तालुका लघुपशुवैद्यकीय सर्व चिकीत्सालयातील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन | सदस्य |
| ४ | सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, संबंधित जिल्हा | सदस्य सचिव |

(७) “जिल्हा गोशाळा पडताळणी समिती” संबंधित गोशाळेस प्रत्यक्ष भेट देऊन विहित अटी व शर्तींची तपासणी करुन महाराष्ट्र गोसेवा आयोगास वस्तुनिष्ठ अहवाल सादर करील.

(८) जिल्हा गोशाळा पडताळणी समितीचा अहवाल व त्यानुसार अनुदानास पात्र गोधनाची संख्या विचारात घेऊन आवश्यक निधीची मागणी गोसेवा आयोगाकडून शासनाकडे करण्यात येईल.

(९) प्राप्त पडताळणी अहवालानुसार गोशाळांना दोन टप्प्यात सहा महिन्यांच्या अंतराने अनुदान वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

(१०) जिल्हा गोशाळा पडताळणी समितीने गोशाळांची प्रत्यक्ष पडताळणी वर्षातून दोन वेळा (एप्रिल ते सप्टेंबर व ऑक्टोबर ते मार्च) करुन पडताळणी महाराष्ट्र गोसेवा आयोगास सादर करील.

(११) पडताळणी अहवाल विचारात घेऊनच गायींच्या संख्येनुसार पुढील अनुदान वितरित करण्यात येईल.

(१२) गोशाळांना अनुदान हे थेट लाभ हस्तांतरण (DBT) व्दारे संबंधित संस्थेच्या बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येईल.

(१३) दुसऱ्या हप्त्यांतर्गत देय अनुदान वितरीत करण्यापूर्वी संस्थेस पहिल्या हप्त्यात दिलेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या प्रतिस्वाक्षरीने सादर करणे बंधनकारक राहील.

(१४) संस्थेत संगोपन करण्यात येत असलेल्या पशुधनाची भारत पशुधन प्रणालीवर नोंद करणे बंधनकारक राहील. तसेच सर्व पशुधनाची टॅगनिहाय स्वतंत्र नोंदवही ठेवणे बंधनकारक राहील.

(१५) संबंधित गोशाळेने नजीकच्या काळात प्रथम प्राधान्याने कायम स्वरूपी चाऱ्याची सोय करण्याकरिता वैरण उत्पादन, चारा प्रक्रिया, मुरघास निर्मिती याबाबत कार्यवाही करणे आवश्यक राहील.

(१६) योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात वित्तीय बाबी वगळता किरकोळ स्वरूपाचे बदल करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास राहतील.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी १००% राज्य पुरस्कृत महाराष्ट्र गोसेवा आयोग लेखाशीर्ष २४०३ई४९६ अंतर्गत ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या उदिष्टाखाली उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय नियोजन विभागाचे अनौ. सं. क्र. ३८४/कार्या१४३१, दि.०२.०८.२०२४ व वित्त विभागाचे अनौ. सं. क्र.६३४/२०२४/व्यय-२, दि.०८.१०.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेताक २०२४१००८१५०५४८८४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NIWRUTTI BHAGUJI MARALE

Digitally signed by NIWRUTTI BHAGUJI MARALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=8a75c414ff50ce35220c63cd53d2eb1a99a474c02300beea74bb051c4c3c90a9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=NIWRUTTI BHAGUJI MARALE
Date: 2024.10.08 14:52:38 +05'30'

**( नि. भा. मराळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत -**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद सदस्य
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन विभाग) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मंत्री (पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. सर्व जिल्हाधिकारी
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद)
१३. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन.
१४. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त.
१५. प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षा) -१/२ महाराष्ट्र, मुंबई / नागपुर.
१६. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -१/२ महाराष्ट्र, मुंबई / नागपुर.
१७. अवर सचिव (पदुम-४), कक्ष अधिकारी (पदुम-१,२ व १६), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. निवड नस्ती पदुम-३.